# महाराष्ट्र शासन


क्र.मअसे-२०२२/४१/४५७
दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६७७६६६
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०००९८.

दिनांक : १५.०३.२०२२

प्रति,
मा.आयुक्त, सर्व महानगरपालिका, (बृहन्मुंबई वगळता)
मा.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापकिय संचालक, विशेष नियोजन प्राधिकरणे,
शासकीय अग्निशमन सेवांचे प्रमुख,
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा.

विषय : महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय-जिल्हा मुख्यालयासाठी "सहाय्यक संचालक" व "अग्निशमन केंद्र अधिकारी" या पदांचा अतिरिक्त कार्यभार देणे किंवा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत.

संदर्भ : १.शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.१४०/नवि-१४, दिनांक २६ मार्च,२०२१.
२.या संचालनालयाचे परिपत्रक क्र.मअसे-२०२२/४१/३५४,दि.२५.०२.२०२२
३.या संचालनालयाचे शुध्दीपत्रक क्र.मअसे-२०२२/४१/३६१,दि.०१.०३.२०२२

महोदय,

या संचालनालयाने निर्गमित केलेले संदर्भ क्र.२ व ३ चे अवलोकन व्हावे.

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये "सहाय्यक संचालक (Assistant Director)" व "अग्निशमन केंद्र अधिकारी (Fire Station Officer)" या पदांचा अतिरिक्त कार्यभार देण्यासाठी किंवा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी **संमतीपत्र (प्रपत्र-अ)** आणि कार्यालय प्रमुखांनी दयावयाचे **ना हरकत प्रमाणपत्र** या संचालनालयास दिनांक १० मार्च,२०२२ पर्यंत मागविण्यांत आले होते

परंतु ब-याचशा महानगरपालिका/नगरपालिका/विशेष नियोजन प्राधिकरणे यांच्या आस्थापनेवरील अग्निशमन अधिका-यांचे वरील पदांसाठी **संमतीपत्र (प्रपत्र-अ)** आणि कार्यालय प्रमुखांनी दयावयाचे **ना हरकत प्रमाणपत्र** प्राप्त झालेले नसल्यामुळे याबाबतची **मुदत दि.२५.०३.२०२२ पर्यंत** वाढविण्यांत येत आहे.

०३. आपल्या अग्निशमन सेवेतील अधिका-यांनी दिलेल्या माहितीची सत्याता पडताळून सोबत जोडलेले **संमतीपत्र (प्रपत्र-अ )** आणि कार्यालय प्रमुखांनी दयावयाचे **ना हरकत प्रमाणपत्र** या संचालनालयास **दिनांक २५ मार्च, २०२२ पर्यंत** pa1.director@mahafireservice.gov.in **(किंवा)** supdt@mahafireservice.gov.in या ईमेलवर पाठविण्यात यावे.

आपला विश्वासू,

**(एस.एस.वारीक)** १५/०३/२२
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

सहपत्र : वरीलप्रमाणे.

प्रत : १. मा.प्रधान सचिव-०२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना माहितीसाठी सादर.
२. प्रमुख अग्निशमन अधिकारी, सर्व महानगरपालिका/शासकीय अग्निशमन सेवा/विशेष नियोजन प्राधिकरणे यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

## प्रपत्र - अ

## संमतीपत्र

मी, ................................................................. कळवू ईच्छितो की, ........................................ या अग्निशमन सेवेमध्ये सध्या ............................ या पदावर दिनांक ........................... पासून कार्यरत आहे. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे पत्र क्र.मअसे-२०२१/४१/४३०, दिनांक १५ एप्रिल,२०२१ अन्वये जिल्हास्तरावर सहाय्यक संचालक / अग्निशमन केंद्र अधिकारी या पदांचा अतिरिक्त कार्यभार अथवा प्रतिनियुक्तीने नियुक्ती होण्याकरीता सहमती मागविलेली आहे. **माझी शैक्षणिक व तांत्रिक अर्हता पुढीलप्रमाणे आहे.**

**१. शैक्षणिक - पदवी ----------- शाखा ------------ विदयापीठ ----------**

**२. तांत्रिक — पाठयक्रमाचे नांव महाविदयालयाचे नांव**

| पाठयक्रमाचे नांव | महाविदयालयाचे नांव |
|---|---|
| **१ उप अग्निशमन अधिकारी (एसओ)** | ------------------ |
| **२ स्थानक अधिकारी (एसटीओ)** | ------------------ |
| **३ विभागीय अग्निशमन (डिओ)** | ------------------ |
| **४ अभियांत्रिकी पदवी (बी.ई-फायर)** | ----------------- |

०२. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांच्या वरील पत्रान्वये मी, .......................... .......................... असे लिहून देतो की, जर माझी जिल्हास्तरावर सहाय्यक संचालक / अग्निशमन केंद्र अधिकारी या पदांचा अतिरिक्त कार्यभार अथवा प्रतिनियुक्तीने नियुक्ती होण्यासाठी माझी निवड झाल्यास मी महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही जिल्हयामध्ये माझी काम करण्याची तयारी दर्शवत असून मी आज दिनांक ............................ रोजी माझी सहमती देत आहे.

स्वाक्षरी : ......................................

नांव : ......................................

पदनांम : ......................................

अग्निशमन सेवेचे नांव : ......................

..................................................

## प्र मा ण प त्र

उक्त नमूद केलेल्या माहितीची मी पडताळणी केलेली असून ती बरोबर आहे व सदर माहिती माझ्याकडून प्रमाणित करण्यांत येत आहे.

ठिकाण : विभाग प्रमुखाची सही ----------------

दिनांक : नाव व पदनांम ----------------------

# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे-२०२२/४१/~~४२०~~२५४
दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६७७६६६
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०००९८.
दिनांक : 25/02/2022

प्रति,
मा.आयुक्त, सर्व महानगरपालिका, (बृहन्मुंबई वगळता)
मा.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापकिय संचालक, विशेष नियोजन प्राधिकरणे,
शासकीय अग्निशमन सेवांचे प्रमुख,
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा.

विषय : महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय जिल्हा मुख्यालयासाठी "सहाय्यक संचालक" व "अग्निशमन केंद्र अधिकारी" या पदांचा अतिरिक्त कार्यभार देणे किंवा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत.

संदर्भ : शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.१४०/नवि-१४, दिनांक २६ मार्च,२०२१.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम,२००९ ची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच जिल्हा स्तरावर नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण स्तरावरील अग्निशमन सेवेचे संनियंत्रण, इत्यादी कामकाजासाठी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाची कार्यकक्षा जिल्हास्तरापर्यंत प्रस्थापित करण्याकरीता शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.१४०/नवि-१४, दिनांक २६ मार्च,२०२१ अन्वये सर्व जिल्हा मुख्यालयाकरीता "सहाय्यक संचालक (Assistant Director)" व "अग्निशमन केंद्र अधिकारी (Fire Station Officer)" या संवर्गाची प्रत्येकी ३६ पदे निर्माण करण्यात आलेली आहे. राज्यातील अग्निशमन सेवांचे सक्षमीकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर पर्यवेक्षीय अधिकारी (Supervising Officer) म्हणून सदर सहाय्यक संचालक या पदांचा अतिरिक्त कार्यभार देण्यासाठी किंवा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याची बाब विचाराधीन आहे. तसेच अग्निशमन केंद्र अधिकारी या पदांचाही अतिरिक्त कार्यभार देण्यासाठी किंवा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करावयाची आहे.

**सहाय्यक संचालक (Assistant Director) या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक व तांत्रिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.:.**

**या पदासाठी सहमती दर्शविणारा अधिकारी हा अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाखालील श्रेणीचा नसावा व खालील शैक्षणिक व तांत्रिक अर्हता पूर्ण करीत असावा.**

१.**शैक्षणिक अर्हता :**

मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.

२. **तांत्रिक अर्हता :**

राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर (National Fire Service College, Nagpur - NFSC) या महाविद्यालयाची अग्निशमन अभियांत्रिकीतील पदवी (B.E.-Fire of NFSC) धारण केलेली असावी **किंवा** विभागीय अग्निशमन अधिकारी पाठयक्रम पूर्ण केलेला असावा.

**अग्निशमन केंद्र अधिकारी (Fire Station Officer) या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक व तांत्रिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.:-**

**या पदासाठी सहमती दर्शविणारा अधिकारी हा उप स्थानक अधिकारी या पदाखालील श्रेणीचा नसावा व खालील शैक्षणिक व तांत्रिक अर्हता पूर्ण करीत असावा.**

१. **शैक्षणिक अर्हता :**

मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.

२. **तांत्रिक अर्हता :**

i) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर (National Fire Service College, Nagpur – NFSC) येथून स्थानक अधिकारी पाठयक्रम पूर्ण केलेला असावा **किंवा**

ii) उप-अग्निशमन अधिकारी पाठयक्रम (Sub-Officer's Course of NFSC) **किंवा** महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा उप-स्थानक अग्निशमन अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी पाठयक्रम (Sub-Officer & Fire Prevention Officers Course of MFSA)

ii) मध्ये पात्रता धारण करीत असलेले अधिकारी यांना किमान ०३ वर्षांचा उप अग्निशमन अधिकारी या पदाचा अनुभव असणे अनिवार्य आहे.

०२. सहा. संचालक आणि अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार किंवा प्रतिनियुक्तीने पाठविणा-या अधिका-यांना ते ज्या आस्थापनेमध्ये/कार्यालयामध्ये काम करीत आहेत त्याच आस्थापनेच्या/कार्यालयाच्या ठिकाणाहून वरील पदाचा कार्यभार करावा लागणार असून जिल्हयातील/तालुक्यातील कोणत्याही भागात कार्यरत पदाच्या जबाबदा-या पार पाडून कर्तव्य बजवावे लागेल. सहा. संचालक आणि अग्निशमन केंद्र अधिकारी या पदांच्या कर्तव्य व जबाबदा-या याबाबत स्वतंत्ररित्या आदेश निर्गमित करण्यांत येतील. सदर पदांचा अतिरिक्त कार्यभार देताना किंवा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करताना जो कोणी विभाग प्रमुख आहे त्याने सहमती दर्शविणारे संबंधीत अधिका-यांकडून सोबत जोडलेल्या **प्रपत्र-अ** नमुन्यानुसार साक्षांकित संमतीपत्र देणे आवश्यक आहे व त्याचबरोबर सर्व इच्छुक अधिकारी याबाबत संबंधित महानगरपालिकांचे आयुक्त, नगरपरिषदांचे मुख्याधिकारी तसेच विशेष नियोजन प्राधिकरणांचे मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापकीय संचालक यांचेकडून **ना हरकत प्रमाणपत्र** देण्यांत यावे. तसेच सदर पत्र हे कार्यालयातील सर्व अधिका-यांच्या निदर्शनास आणून देऊन ते नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यांत यावे. सदर पत्र या कार्यालयाच्या www.mahafireservice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

०३. आपल्या अग्निशमन सेवेतील अधिका-यांनी दिलेल्या माहितीची सत्याता पडताळून सोबत जोडलेले **संमतीपत्र (प्रपत्र-अ )** आणि कार्यालय प्रमुखांनी दयावयाचे **ना हरकत प्रमाणपत्र** या संचालनालयास **दिनांक १० मार्च,२०२२ पर्यंत** pa1@mahafireservice.gov.in या ईमेलवर पाठविण्यात यावे

२५/०२/२२

**(एस.एस.वारीक)**
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

सहपत्र : वरीलप्रमाणे.

प्रत : १. मा.प्रधान सचिव-०२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना माहितीसाठी सादर.

२. प्रमुख अग्निशमन अधिकारी, सर्व महानगरपालिका/शासकीय अग्निशमन सेवा/विशेष नियोजन प्राधिकरणे यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे-२०२२/४१/३६९
दूरध्वनी. २६६७७५५५
फॅक्स : २६६७७६६६
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०००९८.
दिनांक : ०१.०३.२०२२

विषय : महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय-जिल्हा मुख्यालयासाठी "सहाय्यक संचालक" व "अग्निशमन केंद्र अधिकारी" या पदांचा अतिरिक्त कार्यभार देणे किंवा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत.

संदर्भ : १.शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.१४०/नवि-१४, दिनांक २६ मार्च,२०२१.
२.या संचालनालयाचे परिपत्रक क्र. क्र.मअसे-२०२२/४१/३५४, दि.२५.०२.२०२२

## शुध्दी पत्रक

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये या संचालनालयाने निर्गमित केलेल्या परिपत्रकामधील सहाय्यक संचालक व अग्निशगन केंद्र अधिकारी या पदांची शैक्षणिक व तांत्रिक अर्हतेचे खालीलप्रगाणे वाचन करण्यांत यावे.

**सहाय्यक संचालक (Assistant Director) या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक व तांत्रिक अर्हता :-**

१. **शैक्षणिक अर्हता :**
मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.

२. **तांत्रिक अर्हता :**
राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर (National Fire Service College, Nagpur -NFSC) या महाविद्यालयाची अग्निशमन अभियांत्रिकीतील पदवी (B.E.-Fire ) किंवा प्रगत पदविका (Advance Diploma ) **किंवा** एम.आय.- फायर (आयएफई-यु.के.) किंवा एम.आय.-फायर (आयएफई-इंडिया) **किंवा** ग्रेड -आय (यु.के.) उत्तीर्ण असावा.

**अग्निशमन केंद्र अधिकारी (Fire Station Officer) या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक व तांत्रिक अर्हता :-**

१. **शैक्षणिक अर्हता :**
मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.

२. **तांत्रिक अर्हता :**
१) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर (National Fire Service College, Nagpur – NFSC) येथून पदविका (Diploma ) **किवा** एम.आय.-फायर (आयएफई-इंडिया) किंवा ग्रेड -आय (यु.के.) **किंवा**
२) उप-अग्निशमन अधिकारी पाठयक्रम (Sub-Officer's Course of NFSC) **किंवा**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा उप-स्थानक अग्निशमन अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी पाठयक्रम उत्तीर्ण असावा.

(क्र.मा.प.)

पाठयक्रम (Sub-Officer & Fire Prevention Officers Course of MFSA) मध्ये पात्रता धारण करीत असलेले अधिकारी व **२)** मध्ये नमूद अर्हता धारण करीत असलेले अधिकारी यांना किमान ०३ वर्षाचा उप अग्निशमन अधिकारी या पदाचा अनुभव असणे अनिवार्य आहे.

**(एस.एस.वारीक)**
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

प्रति,
मा.आयुक्त, सर्व महानगरपालिका, (बृहन्मुंबई वगळता)
मा.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापकिय संचालक, विशेष नियोजन प्राधिकरणे,
शासकीय अग्निशमन सेवांचे प्रमुख,
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा.

प्रत : १. मा.प्रधान सचिव-०२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना माहितीसाठी सादर.
२. प्रमुख अग्निशमन अधिकारी, सर्व महानगरपालिका/शासकीय अग्निशमन सेवा/विशेष नियोजन प्राधिकरणे यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.